# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 26.07.2024** **वारः शुक्रवार**

---

1. पुण्यात पावसाचं थैमान; शहराच्या काही भागात पूरसदृश परिस्थिती; नागरिकांच्या मदतीसाठी एनडीआरएफसह लष्करालाही पाचारण
2. राज्याच्या अन्य जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस, अनेक नद्यांना पूर; आजही मुसळधार पावसाचा इशारा
3. नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि सोलापूरमध्ये अणुऊर्जा आधारित कांदा बँक सुरू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
4. ज्येष्ठ साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो कालवश आणि
5. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचं आज औपचारिक उद्घाटन

**<u>पाऊस</u>**

पुणे शहर आणि परिसराला काल मुसळधार पावसानं अक्षरशः झोडपून काढलं. मंगळवार रात्रीपासून सुरू असलेली पावसाची संततधार आणि धरणातून सुरू असलेला विसर्ग यामुळे काल शहरातील काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. सिंहगड रस्ता, डेक्कन परिसर, कात्रजसह शहरातील अनेक भागात सकाळी मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं होतं, अनेक घरात, इमारतींमध्ये, दुकानांमध्ये पाणी शिरलं. ठिकठिकाणी झाडं पडली. पूरपरिस्थितीमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आलं. एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या तुकड्यांही या भागात तैनात होत्या. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी या पूरपरिस्थितीचा आढावा घेतला. अजित पवार यांनी पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन नंतर प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली, तसंच नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या. मुरलीधर मोहोळ यांनीही काल रात्री पूरपरिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली.

मुसळधार पावसामुळे काल शाळा महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली होती. पावसामुळे बारावीच्या फेरपरीक्षेला पोहचू न शकलेल्या परिक्षार्थींसाठी पुन्हा परीक्षा होणार आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची आज होणारी पुरवणी परीक्षादेखील पुढे ढकलण्यात आली आहे. डेक्कन जिमखाना परिसरात पुलाची वाडी इथं बुधावारी रात्री विजेचा धक्का लागल्याने तिघांचा मृत्यू झाला. कात्रज परिसरात दोन जण पुराच्या पाण्यात वाहून गेले, लवासामध्ये दोन बंगल्यांवर दरड कोसळली असून चारजण बेपत्ता आहेत. तर जिल्ह्यातील अन्य दोन दुर्घटनांमध्ये दोघांचा मृत्यू झाला आहे.

**<u>राज्य पाऊस</u>**

राज्यात मुंबई, ठाण्यासह इतरही अनेक जिल्ह्यात काल पावसाचा जोर होता.

**<u>सातारा</u>** जिल्ह्यातील कोयना आणि कण्हेर धरणातील पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रात पाणी सोडण्यात येत आहे. कोयना धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्यास सांगलीत कृष्णा नदीतील पाणी पातळी वाढण्याची शक्यता असल्यानं पूर परिस्थिती उदभवण्याची शक्यता आहे. त्याचा सामना करण्यासाठी प्रशासन दक्ष आहे.

**<u>सांगली</u>** जिल्ह्यात नद्या दुधडी भरून वाहत आहेत. नद्यांचं पाणी नागरी वस्तीत पोहोचल्यामुळ सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महापालिका क्षेत्रातील अनेक नागरिकांचं स्थलांतर करण्यात आलं.

**<u>कोल्हापूर</u>** जिल्ह्यात पंचांगगा नदीने धोका पातळी ओलांडल्यानं बालिंगा येथील जुना दगडी कमानी पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. पुरामुळे जिल्ह्यातील अनेक गावांतील नागरिकांचं स्थलांतर करण्यात आलं आहे.

**<u>रायगड</u>** जिल्ह्यात कुंडलिकेला पूर आल्यानं रोहा शहर आणि परिसर जलमय झाला होता. अष्टमीला रोह्याशी जोडणाऱ्या पुलावर दोन ते तीन फूट पाणी आल्यानं अष्टमी गावचा संपर्क तुटला आहे. **<u>रत्नागिरी</u>** जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून, जिल्ह्यातल्या नद्यांची पाणीपातळीही झपाट्याने वाढत आहे.

**<u>चंद्रपूर</u>** जिल्ह्यातही मागील चार ते पाच दिवसापासून पावसाचा जोर आहे. यामुळे जिल्ह्यातील अनेक नदी, नाल्यांना पूर आले आहेत. **<u>वर्धा</u>** नदीच्या पाणीपातळीत वाढ झाल्यामुळे राजुरा- हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग काल सायंकाळपासून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला.

**<u>गडचिरोली</u>** जिल्ह्यात काल दिवसभर सुरु असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांसह 50 मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली होती. **<u>लातूर</u>** शहर आणि जिल्ह्यातही गेल्या तीन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू होती.

दरम्यान राज्याच्या बहुतांश भागात आजही पावसाची शक्यता असून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या पार्श्र्वभूमीवर पुणे, ठाणे, नवी मुंबईसह विविध जिल्ह्यात शाळा-महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**<u>कारगील विजय दिन</u>**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रचंड साहस, शौर्य आणि समयसूचकता यांच्या बळावर भारतीय सैन्यानं कारगिल युद्धात विजय मिळवला; त्या घटनेला आज 25 वर्ष पूर्ण होत आहेत. कारगिल विजय दिनाच्या रौप्य महोत्सवानिमित्त पंतप्रधान आज कारगिल युद्ध स्मारकावर हुतात्म्यांना श्रृद्धांजली अर्पण करणार आहेत. कारगिल युद्धातल्या शौर्याबद्दल वीर चक्र पुरस्कारानं सन्मानित झालेले साताऱ्याचे सुपुत्र कर्नल सचिन निंबाळकर यांचं हे मनोगत....

**<u>राष्ट्रपती पुणे दौरा</u>**

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय अभिमत विद्यापीठाचा 21 वा पदवीप्रदान समारंभ येत्या सोमवारी विद्यापीठाच्या पुण्याजवळील लवळे इथल्या परिसरात होणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून राज्यपाल रमेश बैस या सोहळ्याचे विशेष अतिथी असतील.

**<u>कांदा बँक</u>**

कांद्याची नासाडी रोखण्याबरोबरच त्याच्या साठवणुकीसाठी महाराष्ट्रात अणुऊर्जा आधारीत कांदा महाबॅंक प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. राज्यात नाशिक, छत्रपती संभाजी नगर आणि सोलापूर इथं तातडीने कांद्याची बॅंक सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत एका आढावा बैठकीत दिले. अणु ऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर या बैठकीत दुरस्थ माध्यमातून सहभागी झाले होते. कांदा हे नाशवंत पीक आहे. अणुऊर्जेच्या माध्यमातून त्यावर विकिरण प्रक्रीया करून कांद्याची साठवणूक केली जाणार आहे.

**<u>दिब्रिटो निधन</u>**

ख्यातनाम साहित्यिक आणि सामाजिक तसंच पर्यावरणवादी कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या पार्थिव देहावर काल संध्याकाळी वसईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल पहाटे वसई इथं वार्धक्यानं निधन झालं. ते 82 वर्षांचे होते. दिब्रिटो यांनी 93व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद भूषवलं होतं. आनंदाचे अंतरंग-मदर तेरेसा, ओऍसिसच्या शोधात, ख्रिस्ताची गोष्ट, तेजाची पाऊले, मुलांचे बायबल, सृजनाचा मळा ही फ्रान्सिस दिब्रिटो यांची पुस्तकं, तसंच 'नाही मी एकला' हे त्यांचं आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

**<u>ऑलिम्पिक</u>**

पॅरिस ऑलिम्पिकचं आज औपचारिक उद्घाटन होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री 11 वाजता हा सोहळा सुरु होणार आहे. तत्पूर्वी या स्पर्धेला सुरुवात होण्याच्या एक दिवस आधीच तिरंदाजीमध्ये भारतीय महिला आणि पुरुष संघानं मानांकन फेरीत दमदार कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरीतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे.

दरम्यान पॅरिस ऑलिम्पिकसाठी राज्यातल्या काही खेळाडूंची निवड झाली आहे. स्पर्धेत ते चांगली कामगिरी करून राज्याची मान अभिमानानं उंचावतील अशी अपेक्षा आहे, ऐकूया त्या विषयी सविस्तर माहिती…..

**महाराष्ट्राचे कुस्तीपटू खाशाबा जाधव यांनी 1952 मध्ये ऑलिम्पिक पदक जिंकून भारताचा श्रीगणेशा केला खरा मात्र 72 वर्ष उलटूनही महाराष्ट्राची झोळी अद्याप रिकामीच आहे. यंदाही महाराष्ट्रातील पाच खेळाडू ऑलिम्पिकच्या रिंगणात आहेत. तिरंदाजी प्रकारात सातारचा प्रवीण जाधव, मैदानी प्रकारात तीन हजार मीटर स्टिपलचेस गटात बीडचा अविनाश साबळे, उंच उडी प्रकारात नाशिकचा सर्वेश कुशारे, बॅडमिंटन दुहेरी प्रकारात मुंबईचा चिराग शेट्टी तर 50, मीटर रायफल थ्री पोझीशन प्रकारात नाशिकचा स्वप्नील कुसाळे हे खेळाडू यंदा तरी पदकाच्या दुष्काळ संपवतील अशी आशा असून यातील बहुतेकांच्या गाठीशी गेल्या वेळच्या ऑलिम्पिकच्या अनुभव आहे. ऑलिंपिक विजेत्यांचा इतिहास जिद्दीचां, प्रतिकुलतेचा अन संघर्षाचा असुन अशातुनच जागाला विजेते मिळत असतात हीच बाब अधेरेखित करण्यासाठी महाराष्ट्रीतल खेळाडु सज्ज झाले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी, पुण्याहून सीमा चोरडीया.**

**<u>क्रिकेट</u>**

महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि बांग्लादेश यांच्यात उपांत्य सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी दोन वाजता हा सामना सुरू होईल, या स्पर्धेतले आतापर्यंतचे सर्व सामने जिंकून भारतीय संघ अ गटात अव्वल स्थानावर आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.

#